# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 05/05/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर न्यू अन्ना गॅरेज मौदा येथे दि. 03/05/2021 चे 21.00 वा. ते दि. 04/05/2021 चे 08.00 वा. चे फिर्यादी नामे– अशोक कुमार कोपूल्ली, वय 34 वर्ष, रा. श्रीकृष्ण नगर मौदा ता. मौदा हे मागील 5 वर्षापासून न्यू अन्ना गॅरेज चालवितात व त्यामध्ये ट्रॅक्टर व जे.सी.बी दुरुस्तीचे काम करतात. कोविड च्या प्रार्दूभावाने लॉकडाउन लागला तेव्हापासून फिर्यादीयांचे गॅरेज बंद आहे. गॅरेज बाहेर रिपरिंग साठी आलेले ट्रॅक्टर व इतर सामान ठेवले असल्याचे फिर्यादी रोज सकाळी, संध्याकाळी पाहणी करीत असतात. दि. 04/05/2021 रोजी सकाळी 08.00 दरम्यान फिर्यादी हे गॅरेज कडे गेले असता गॅरेज बाहेर ठेवलेले सामानाची पाहणी केली असता त्यांना लक्षात आले गाडी मधून काढलेला खराब ऑईल ने भरलेले प्रत्येकी 200 लीटर चे एकुण तिन ड्रम एकुण कि. 24,000/–रु. तसेच रिपेरिंग करीता आलेले रेल्वे टक अलाईमेंट सेट करण्याची मशीन कि. 25,000/–रु. असे एकुण 49,000/–रू. चा मद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चांगदेव कुथे मो.क्र. 9764007720 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि.मी. अंतरावर गोंडखैरी येथे दिनांक 28/04/2021 चे 20:30 वा. दरम्यान अज्ञात मोटरसायकल चालक आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादींचे वडील नामे– श्रावण ज्ञानेश्वर काळे, वय 53 वर्ष, रा. गोंडखैरी यांचे मोटरसायकला धडक दिली. या अपघातात फिर्यादींचे वडीलाचे गंभीर जखमी होवुन उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– वैभव श्रावण काळे, वय 22 वर्ष, रा. गोंडखैरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134/177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ सपाटे 9823998476 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 3 कि. मी. अंतरावर पंचाळा शिवार येथे दिनांक 01/04/2021 चे 22.00 वा. दरम्यान विजय गुलाबराव वैदय(मृतक), वय 56 वर्ष, रा. रामाजी नगर, रामटेक हे पत्नी सोबत त्यांचे मोटरसायकलने पांढराबोडी जि. भंडारा येथे लग्नाला गेले होते. तेथुन ते परत येत असतांना पंचाळया फाटयावळ अचानक त्यांच्या मोटरसायकल समोर डुक्कर आडवा आल्याने ते मोटरसायकलसह खाली पडल्याने त्यांचे डोक्यावर मार लागुन ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता न्युरान हास्पीटल धंतोली नागपुर येथे भरती केले असता उपचारादरयान दि. 17/4/2021 रोजी 12.30 वा. डॉक्टरांनी त्यास मृत घोषीत केले. पो. स्टे. रामटेक येथे संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा प्रभाकर तबाने पोस्टे धंतोली नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक दिपक यादव 9637772404 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर